## <u>वर नमुद तक्त्यातील उमेदवारांना अत्यंत महत्वाच्या सुचना.</u>

१) वनरक्षक भरती प्रक्रिये अंतर्गत रिक्त पदांच्या १:३ हे प्रमाण नियमित करण्याकरिता वर नमुद उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या दुस-या टप्प्यात त्यांची शारिरीक पात्रता तसेच शैक्षणिक व तत्सम कागदपत्रांच्या तपासणीकरिता बोलाविण्यांत आलेले आहे. वरील तक्त्यातील रकाना क्र.४ मध्ये नमुद केलेले जे उमेदवार शारिरीक पात्रता, शैक्षणिक व तत्सम कागदपत्रांच्या तपासणीत पात्र ठरतील त्यापैकी सदर उमेदवाराने धावण्याच्या चाळणी चाचणीत नोंदविलेली वेळ या गुणवत्तेच्या आधारे रकाना क्र.२ मध्ये नमुद केलेल्या संख्येइतक्याच उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरिता पात्र करण्यांत येईल याची उमेदवाराने कटाक्षाने नोंद घ्यावी.

२) वर नमुद तक्त्यातील खेळाडु या समांतर आरक्षणांतर्गत भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरिता पात्र ठरणा-या पुरुष/महिला खेळाडु उमेदवारांनी राष्ट्रीय स्तरावरील/राज्य स्तरावरील वैयक्तिक अथवा सांघिक खेळामध्ये भाग घेवून प्रथम/व्दितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणा-या उमेदवारांचाच पात्रतेसाठी विचार करण्यात येईल.

३) वर तक्त्यातील नमुद अंशकालीन कर्मचारी या समांतर आरक्षणाखाली भरती प्रकियेच्या पुढील टप्प्याकरिता पात्रतेकरिता उमेदवारांना शासकिय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यन्त दरमहा मानधनावर काम केल्याचे व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद असलेल्या पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना विहीत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील असे प्रमाणपत्र सादर करणा-या उमेदवारांचाच विचार केला जाईल.

## उमेदवारांकरिता इतर महत्वाच्या सुचना

४)

| | |
|---|---|
| १) | वरील यादीतील भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांची शारिरीक पात्रता तपासणी (उंची, छातीची मोजमापे, वजन) तसेच शैक्षणिक व तत्सम कागदपत्रांची तपासणी **<u>दिनांक ३० डिसेंबर, २०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता</u>** आयोजित करण्यांत येत असुन उमेदवारांनी खालील नमुद मुळ कागदपत्रे आणि छायांकित प्रतीच्या स्वसाक्षांकित केलेल्या संचासह न चुकता उपस्थित रहावे. सदर उमेदवारांना ही शेवटची संधी असून यानंतर भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरिता त्यांचे नावाचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. |
| २) | (१) भरती प्रक्रियेचे ओळखपत्र (२) जन्म तारीख नमुद असलेले प्रमाणपत्र (जसे शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा प्रमाणपत्र) (३) माध्यमिक/उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा प्रमाणपत्र आणि गुणपत्रक (४) जात प्रमाणपत्र (५) जात वैधता प्रमाणपत्र (६) समांतर आरक्षण असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र (जसे भुकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त/माजी सैनिक/होमगार्ड/ खेळाडु/अंशकालीन कर्मचारी (७) निकटतम वर्षाचे नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र (८) ओळखपत्र (आधारकार्ड, वाहन परवाना इ.) |

| | |
|---|---|
| ३) | अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीकरिता राखीव असलेली पदे ही फक्त नाशिक जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधुन शैक्षणिक तथा तत्सम कागदपत्रांच्या तपासणीअंती भरण्यांत येतील. याकरिता उमेदवार हा मुळचा ज्या ठिकाणचा असेल ते ठिकाण त्याच्या जात प्रमाणपत्रावर नमुद करण्यांत येत असल्याने सदर प्रमाणपत्राच्या आधारे उमेदवारांची मुळ ठिकाणची प्रमाणित माहिती ग्राह्य धरण्यांत येईल. |
| ४) | मागास प्रवर्गातील उमेदवाराची जर खुल्या प्रवर्गात निवड झाल्यास सदर मागासवर्गीय उमेदवाराने खुल्या प्रवर्गासाठीच्या सर्व अटी पुर्ण करणे आवश्यक राहील (उदा. खुल्या प्रवर्गासाठी असलेली २५ वर्षाची कमाल वयाची अट, किमान शैक्षणिक पात्रता, भरती प्रक्रिया शुल्क, शारिरीक पात्रता इ.) |
| ५) | खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणाकरिता तसेच इ.मा.व/विमाप्र/भ.ज.ड/विजा-अ या सामाजिक प्रवर्गाकरिता निकटतम कालावधीचे नॉन क्रिमेलियर प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. सदर प्रमाणपत्राशिवाय उमेदवारांचा संबधित प्रवर्गाकरिता विचार केला जाणार नाही. |

| **वरील यादीतील उमेदवारांची शारिरीक पात्रता तपासणी/शैक्षणिक व तत्सम कागदपत्रांच्या तपासणीचे वेळापत्रक आणि ठिकाण** | | |
|---|---|---|
| **दिनांक ३०/१२/२०१६** | **सकाळी ११.०० वाजता** | **मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नाशिक यांचे कार्यालयाचे आवार, अरण्य संकुल, त्र्यंबक नाका, नाशिक ४२२००२** |

**सदस्य सचिव**
**वनरक्षक भरती प्रक्रिया २०१६ तथा**
**उपवनसंरक्षक पूर्व भाग नाशिक**